पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर
पोलीस कल्याण शाखा
मालटेकडी जवळ, कॅम्प रोड अमरावती
ई-मेल cp.amravati@mahapolice.gov.in

दिनांक ०१/०२/२०२५

# प्रेस नोट

आज दिनांक 01/02/2025 रोजी पोलीस कवायत मैदान अमरावती शहर येथे पोलीस आयुक्तालय अमरावती शहर व पोलीस अधिक्षक अमरावती ग्रामीण अंतर्गत मा.ना. डॉ.श्री.पंकज भोयर राज्यमंत्री गृह (ग्रामीण), गृह निर्माण, शालेय शिक्षण ,सहकार, खनिकर्म विभाग महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली पोलीस कुटुबियांसोबत संवाद मेळावा आयोजीत करण्यात आला होता.

संवाद मेळावा मध्ये मा. पोलीस आयुक्त श्री. नविनचंद्र रेड्डी व पोलीस उपायुक्त (मुख्यालय) श्रीमती कल्पना बारवकर, यांनी पोलीस आयुक्तालय अमरावती शहर व अमरावती ग्रामीण येथील पोलीस स्टेशन, शासकीय निवास्थानाची झालेली दुरवस्था व त्यांची दुरुस्ती तसेच नविन शासकिय निवास्थान यांचे बांधकाम सुरु असल्याबाबतची माहिती दिली . पोलीस स्टेशनच्या जुन्या जिर्ण इमारतीचे पुर्णबांधनी व शासकिय निवास्थानाची नवीन बांधकामाची आवश्यकता असल्याबाबत अवगत करुन दिले. पोलीस आयुक्तालय हददीतील वसंत हॉल व जलतरण तलावाचे नुतनीकरण करण्यात येवुन पोलीस व जनतेकरीता उपलब्ध झाल्या बाबतची माहिती त्यांनी या वेळी दिली.

यावेळी मा.ना. डॉ.श्री.पंकज भोयर, यांनी पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांचे कुटुंबीय यांचे सोबत संवाद साधुन पोलीसांचे सार्वत्रीक व वैयक्तीक समस्या तसेच शासकीय निवास्थानाबात बाबत असणा-या अडचणी जाणुन घेतल्या व त्यावर उपाययोजना करण्या बाबत आश्वासन दिले.

पोलीस अधिक्षक अमरावती ग्रामिण श्री विशाल आनंद यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. सदर संवाद मेळावा करीताअप्पर पोलीस अधिक्षक अमरावती ग्रामिण श्री पंकज कुमावत, पो.उपायुक्त परिमडळ-2 श्री. गणेश शिंदे, पो.उपायुक्त परिमडळ-1 श्री. सागर पाटील , तसेच सर्व सहायक पोलीस आयुक्त , ठाणे व शाखा प्रभारी अधिकारी , पोलीस अंमलदार व त्यांचे कुटुबिय व मंत्रालयीन अधिकारी ,कर्मचारी उपस्थित होते.